# मुख्य महाव्यवस्थापक(प्रवसु) यांचे कार्यालय,

प्रशिक्षण व सुरक्षा प्रविभाग, मराविविकंम, चेमरी नं. १,
एनटीपीएस कॉलनी, एकलहरे, नाशिक (महाराष्ट्र)-४२२ १०५
फोन नं. ०२५३-२८१००४०(का), २८१२९४४(वै ), फॅक्स नं. २८१०१७५
Email: cetrd@mahadiscom.in


जा. क्रं. मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक/ No - 1684, दिनांक 10 OCT 2017

## परिपत्रक

**विषय : व्याख्याता साठी सुधारीत मानधना बाबत.**

संदर्भ : १. प्रशासकीय परिपत्रक मुं. ३४ दि. ०५.०४.२००६.
२. परिपत्रक CE/TRD/TRG/१९३० दि. १०.०८.२००७.
३. मुमव्य/ प्रवसु/ एकलहरे/ नाशिक/ ६३२ दि.२३.०३.२०१६.
४. दि.२९.०९.२०१७ च्या कार्यालयीन टिपणी मंजुरीनुसार.

महावितरण कंपनीच्या धोरणानुसार सद्यास्थितीत वेतनगट २,३,४ मधील कर्मचारी व अधिकारी यांना विविध विषयांचे व गरजेनुसार प्रशिक्षण देण्याचे कार्य (प्रवसु) एकलहरे केंद्र व त्या अंतर्गत येणाऱ्या सांगली, औरंगाबाद, अमरावती व नाशिक या चार विभागीय प्रशिक्षण केंद्रामार्फत केले जाते. सदर प्रशिक्षणाकरीता बाहयस्त्रोत व्याख्याता, कंपनीतील निवृत्त अधिकारी यांना दिड तासाच्या तासीकेसाठी सध्या प्रचलीत परिपत्रक क्र.CE/TRD/TRG/६३२ दि. २३.०३.२०१६ नुसार मानधन अदा करण्यांत येत आहे. तथापी जिल्हा स्तरावरील लघु प्रशिक्षण केंद्रात येणाऱ्या व्याख्यातासाठी परिपत्रक क्र.CE/TRD/GAD/TRG/१९३० दि १०.०८.२००७ तसेच प्रशासकीयपरिपत्रक २३४ दि.२०.०६.२००५ अटी व शर्ती नुसार दर पूर्वी प्रमाणे लागुआहेत. सन २००७ पासून आतापर्यंतच्या कालावधीचा विचार करता लघु प्रशिक्षण केंद्रा (STC) मध्ये येणाऱ्या व्याख्याताचे मानधन वाढ होण्यासाठी या कार्यालयाकडुन मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

प्रशिक्षणाचा दर्जा उत्कृष्ट राहावा तसेच सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये व्याख्यातासाठी चे मानधन सारखे राहावे. या उद्देशाने वरील प्रस्तावास सक्षम अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी कार्यालयीन टिपण्णी दि. २९.०९.२०१७ नुसार ०१ ऑक्टोबर २०१७ पासून प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र नाशिक व त्याअंतर्गत येणाऱ्या सांगली, औरंगाबाद, अमरावती व नाशिक या चार प्रादेशिक केंद्रासह सर्व लघु प्रशिक्षण केंद्रा (STC) मध्ये प्रशिक्षण देणाऱ्या बाहयस्त्रोत व्याख्याता, महावितरण कंपनीतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना दर दीड तासाच्या तासिकेसाठी खालील प्रमाणे सुधारीत मानधन देण्यास मंजुरी दिलेली आहे.

| **बाहयस्त्रोत व्याख्याता, निवृत्त कर्मचारी व कंपनीतील अधिकारी/ कर्मचारी** | **मानधन (१.३० तासाच्या व्याख्यानासाठी) रुपये** |
|---|---|
| अधिक्षक अभियंता समकक्ष व त्यावरील अधिकारी. | १०००/- |
| अतिरिक्त कार्यकारी अभियंता समकक्ष व त्यावरील अधिकारी. | ७००/- |
| उप कार्यकारी अभियंता व त्याखालील अधिकारी व कर्मचारी. | ५००/- |

पान नं २ वर.....

वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व प्रशिक्षण केंद्रा मधील (लघु प्रशिक्षण केंद्रासह) व्याख्यात्यांना मानधन देण्यात यावे. यापूर्वी मानधनाबाबत व्याख्यात्यांच्या अनुषंगाने काढण्यात आलेली सर्व परिपत्रके या परिपत्रकाने अधिक्रमित करण्यात यावीत जेणे करुन सर्व प्रशिक्षण केंद्रा मधील (लघु प्रशिक्षण केंद्रासह) व्याख्यात्यांच्या मानधनात समानता येईल.

सदर परिपत्रक सक्षम अधिकारी यांचे मान्यतेनुसार प्रसारीत करण्यात येत आहे. हे परिपत्रक महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(रजंना सं.पगारे)
मुख्य महाव्यवस्थापक
(प्रवसु) एकलहरे, नाशिक

प्रत सविनय सादर :

१. मा.संचालक, (संचलन)/ (प्रकल्प)/ (वित्त), सांघीक कार्यालय, मुंबई.
२. मा. कार्यकारी संचालक (मासं ), सांघीक कार्यालय, मुंबई.

प्रत रवाना : १) मा. अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक, यांचे विषेश अधिकारी, सांघीक कार्यालय मुंबई.
२) सर्व मुख्य अभियंता (संवसु) परिमंडल.

प्रत :

१. सर्व अधिक्षक अभियंता (संवसु) मंडलकार्यालय.
२. अति. कार्यकारी अभियंता, अमरावती, औरंगाबाद, सांगली, नाशिक.